लोकमत

## महिला आरोग्य हक्क परिषदेत विविध मागण्या : आज समारोप; महिलांच्या आरोग्य, शैक्षणिक, सामाजिक प्रश्नांवर मंथन

# आंतरजातीय, धर्मीय विवाहाबाबत नवीन कायदा व्हावा

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** आंतरजातीय, धर्मीय विवाहाबाबत नवीन कायदा व्हावा. प्रतिष्ठेपायी होणाऱ्या हिंसा रोखण्यासाठी नवा कायदा करण्यात यावा. वंचित भटक्या समाजाला आरोग्य सेवा मिळाव्यात, अशा विविध मागण्या शुक्रवारी राज्य महिला आरोग्य हक्क परिषदेत करण्यात आल्या. महिलांच्या आरोग्य, शैक्षणिक, सामाजिक, आदी प्रश्नांवर विचारमंथन होत असलेल्या या परिषदेचा आज, शनिवारी दुपारी बारा वाजता समारोप होणार आहे.

शिवाजी विद्यापीठातील श्रीमती शारदाबाई पवार अध्यासन आणि आरोग्य हक्क परिषद संयोजन समितीतर्फे आयोजित विद्यापीठातील वि. स. खांडेकर सभागृहात राज्य महिला आरोग्य हक्क परिषद होत आहे. या परिषदेच्या दुसऱ्या दिवसाची सुरुवात 'धर्म, जाती आधारित उन्मादाचे अस्वस्थ वर्तमान आणि महिलांवर होणारे परिणाम' या विषयावरील सत्राने झाली. त्यामध्ये अग्रणी सोशल फौंडेशनच्या रिटा माने यांनी भंगार गोळा करणाऱ्या महिलांच्या आरोग्याचा प्रश्न मांडला. भारतीय महिला फेडरेशनच्या वसुधा कल्याणकर यांनी औरंगाबाद येथील दंगलीमध्ये ज्यांचे नुकसान झाले आहे. त्यांना मदत मिळावी, अशी मागणी केली. कोल्हापुरातील सामाजिक कार्यकर्ते रवि देसाई यांनी शासनाने महिला धोरणामध्ये आरोग्यविषयक हक्काचा विचार करणे, आवश्यक असल्याचे सांगितले. सर्वसमावेशक संस्थेच्या शैला यादव यांनी भटक्या विमुक्त समाजाबाबतचा भेदभाव शासनाने दूर करावा. रोजगार हमी योजनेमध्ये या समाजाचा समावेश करण्याची मागणी केली. शब्बीर कलेगार आणि सांगलीतील विद्रोही महिला मंचच्या संगीता भिंगारदिवे यांनी वंचित आणि अल्पसंख्याक समाजातील महिलांच्या प्रश्नांची मांडणी केली. यानंतर वेश्या व्यवसायातील महिला आणि आरोग्य अधिकार, दिव्यांग महिला, एचआयव्हीची लागण असणाऱ्या गरोदर स्त्रियांना आरोग्य व्यवस्थेत मिळणारी भेदभावाची वागणूक, विषमतामूलक आर्थिक धोरण, आदी विषयांवर चर्चा झाली. यावेळी ज्येष्ठ स्त्रीवादी कार्यकर्त्या मनीषा गुप्ते, संपदा ग्रामीण महिला संस्थेच्या (संग्राम) जनरल सेक्रेटरी मीना शेषू, अध्यासनाच्या समन्वयक प्रा. डॉ. भारती पाटील, तनुजा शिपूरकर, अनुराधा भोसले, स्मिता पानसरे, सुमन पुजारी, विभुती पटेल, शुभदा देशमुख, लता भिसे, आदींसह महिला कार्यकर्त्या उपस्थित होत्या. परिषदेच्या समन्वयक काजल जैन यांनी सूत्रसंचालन केले.



कोल्हापुरात शुक्रवारी राज्य महिला आरोग्य हक्क परिषदेत सांगलीतील विद्रोही महिला मंचच्या संगीता भिंगारदिवे यांनी मार्गदर्शन केले. यावेळी डावीकडून रोशनी सुशीला नाईक, शबनम मुजावर, संगीता मनोजी, सुलभा होवेले, माया भुजबळ, विजयालक्ष्मी, आदी उपस्थित होत्या.

### 'आसमा'ला अश्रू अनावर

आंतरधर्मीय विवाह करणाऱ्या 'आसमा' यांनी पहिल्या सत्रावेळी अनुभवकथन केले. माझ्या आई-वडिलांनी हा विवाह अजूनही मान्य केलेला नसल्याचे सांगताना त्यांना अश्रू अनावर झाले. पुणे येथील इकोनेट संस्थेच्या कार्यकर्त्यांनी पथनाट्याद्वारे आंतरजातीय, धर्मीय विवाहाबाबतचे समाजातील वातावरण, होणारा हिंसाचार यावर प्रकाशझोत टाकला.

### धर्मनिरपेक्षता, सांस्कृतिक विविधतेला धोका

डॉ. मेघा पानसरे म्हणाल्या, स्त्रियांवरील हिंसा जाती आणि धर्माशी जोडली जात आहे. धर्मनिरपेक्षता, सांस्कृतिक विविधता या मूल्यांना धोका निर्माण झाला आहे. बहुसंख्याकांच्या धार्मिक वर्चस्वामुळे अल्पसंख्यांकांना भीतीच्या दडपणाखाली राहावे लागत आहे. आंतरजातीय, धर्मीय विवाहाबाबत आणि प्रतिष्ठेपायी होणाऱ्या हिंसा रोखण्यासाठी शासनाने नवीन कायदा करावा.

# महिला आरोग्य हक्क परिषदेचा आज समारोप

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठातील शारदाबाई पवार अध्यासन व राज्य महिला आरोग्यातर्फे आयोजित महिला हक्क परिषदेचा समारोप शनिवार (ता. १७) रोजी होणार आहे. गेल्या दोन दिवसांपासून शिवाजी विद्यापीठातील वि. स. खांडेकर भाषा भवनातील सभागृहात ही परिषद सुरू आहे.

शुक्रवारी परिषदेच्या दुसऱ्या दिवशी धर्म, जाती आधारित उन्मादाचे अस्वस्थ वर्तमान आणि महिलांवर होणारे परिणाम या विषयावर चर्चासत्र झाले. यावेळी भटक्या जाती-जमाती समाजातील आणि स्थलांतरित महिला आणि त्यांच्याशी होणारा भेदभाव या विषयावर दीपाली वाघमारे यांनी वैचारीक मांडणी केली. तर रीटा माने व शहाजी गडहिरे यांनी या विषयाचे अभ्यासत्मक विश्लेषण केले.



दुसऱ्या सत्रात विविध दलित, वंचित, अल्पसंख्यांक समुहातील महिलांवर आरोग्य व्यवस्थेत होणारा भेदभाव आणि त्यांच्या आरोग्यावर होणारे परिणाम या विषयावर तज्ज्ञ महिलांनी मनोगत व्यक्त केले. तर शेवटच्या सत्रात वेश्या व्यवसाय करणाऱ्या स्त्रियांचे आरोग्य अधिकारांचे मुद्दे या विषयावर परिसंवाद झाला.

शनिवारी, परिषदेच्या तिसऱ्या दिवशी 'स्त्रियांमधील ताणतणाव आणि मानसिक आरोग्याचे प्रश्न' या समस्येवर पहिल्या सत्रात चर्चा होणार आहे. तर महाराष्ट्र : सामाजिक, राजकीय वर्तमान आणि महिलांचे आरोग्य या विषयावर सकाळी ११ वाजता परिसंवादाचे आयोजन केले आहे.

# स्त्रियांच्या मूलभूत प्रश्नांची सोडवणूक करा

## महाराष्ट्र महिला आरोग्य हक्क परिषदेतील सूर

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

जात आणि धर्माच्या जोखडात स्त्रिया अडकून पडल्या आहेत. दंगली, दुष्काळ अशा समस्यांवेळी स्त्रियांच्या समस्यांमध्ये वाढ होते. त्यामुळे स्त्रियांच्या मूलभूत प्रश्नांची सोडवणूक करणे आवश्यक आहे, असा सूर शिवाजी विद्यापीठात सुरू असणाऱ्या महाराष्ट्र महिला आरोग्य हक्क परिषदेमध्ये उमटला.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आयोजित महाराष्ट्र महिला आरोग्य हक्क परिषदेत बोलताना संगीता भंगारदिवे.** (छाया : पांडुरंग पाटील)

महाराष्ट्र महिला आरोग्य हक्क परिषद आणि शिवाजी विद्यापीठाचे शारदाबाई पवार अध्यासन यांच्यातर्फे सातव्या महाराष्ट्र महिला आरोग्य हक्क परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. शुक्रवारी परिषदेचा दुसरा दिवस होता.

पहिल्या सत्रामध्ये बोलताना मेघा पानसरे म्हणाल्या, स्त्रियांवरील हिंसेला जात आणि धर्माशी जोडले जाते. धर्मांधता आणि शासन संस्था एकत्र येतात तेव्हा स्त्रियांसाठी धोकादायक परिस्थिती निर्माण होते. संविधानातील विविधतेला धोका निर्माण झाला आहे. बहुसंख्याकांचे धार्मिक वर्चस्व वाढल्याने अल्प संख्याकांना भीतीच्या छायेखाली राहावे लागत आहे.

यावेळी औरंगाबाद दंगलीमधील पीडितांना नुकसानभरपाई मिळावी, भटक्या, विमुक्त समजातील महिलांना दुष्काळाच्या काळात वेगळे रोजगारविषयक कार्यक्रम घ्यावेत. दलित व वंचित महिलांना आरोग्य सेवा पुरविण्यात याव्यात. दुष्काळात महिलांना आरोग्यासह अन्य समस्या निर्माण होतात. त्यामुळे त्यांना पाण्याची उपलब्धता व्हावी. महिला धोरणाची अंमलबजावणी करून महिलांसाठी स्वच्छतागृहे उभारावीत, अशा मागण्या औरंगाबादच्या वसुधा कल्याणकर, कोल्हापूरचे रवी देसाई, शैला यादव, शब्बीर कलेगार यांनी केल्या. अग्रणी सोशल फौंडेशनच्या रिटा माने यांनी भंगारवेचक महिलांवरील सर्व्हे सादर केला.

या परिषदेस मनीषा गुप्ते, स्मिता पानसरे, सुमन पुजारी, विभुती पटेल, शुभदा देशमुख, लता भिसे, सीमा पाटील, काजल जैन आदींची प्रमुख उपस्थिती होती.

### 'आसमा'ला अश्रू अनावर

आसमा या मुस्लिम तरुणीने एका हिंदू तरुणाशी आंतरधर्मीय विवाह केला, त्यांचा सुखाचा संसार सुरू आहे. आता त्यांना एक मुलगीही आहे. मात्र अजूनही आपल्या कुटुंबीयांनी आपल्याला न स्वीकारल्याची सल तिच्या मनात आहे. पहिल्या सत्रात तिने मनोगत व्यक्त केले. मात्र आपल्या भावना मांडताना तिला अश्रू अनावर झाले होते. या सत्रामध्येचे इकोनेट पुणे या संस्थेने आंतरजातीय, आंतरधर्मीय विवाहासंदर्भात पथनाट्य सादर केले. या संदर्भात सरकारने फक्त योजना न आणता कायदा करावा, अशी मागणीही करण्यात आली.

सकाळ

# संविधानातील विविधतेच्या मूल्याला धोका

## परिषदेत वक्त्यांचा सूर; शारदाबाई गोविंदराव पवार अध्यासनातर्फे परिषदेची आज सांगता

**कोल्हापूर, ता. १६ :** 'औरंगाबाद दंगलीतील नुकसानग्रस्तांना मदत मिळावी, ऑनरकिलिंगविरोधी व आंतरजातीय विवाहाचा कायदा करावा', अशा मागण्या राज्य महिला आरोग्य हक्क परिषदेत आज केल्या. जात व धर्माशी महिलांवरील हिंसा जोडली जात असून, संविधानातील धर्मनिरपेक्षता व सांस्कृतिक विविधतेच्या मूल्याला धोका निर्माण झाल्याचा सूरही व्यक्त झाला.

शिवाजी विद्यापीठातील शारदाबाई गोविंदराव पवार अध्यासन व आरोग्य हक्क परिषद संयोजन समितीतर्फे आयोजित राज्य महिला आरोग्य हक्क परिषदेत दुसऱ्या दिवशी विविध वक्त्यांनी महिलांच्या प्रश्नांच्या अनुषंगाने चर्चा केली. वि. स. खांडेकर भाषाभवनमध्ये परिषदेचे आयोजन केले आहे. उद्या (ता. १७) परिषदेचा समारोप होईल.



**कोल्हापूर : राज्य महिला आरोग्य सेवा हक्क परिषदेत बोलताना संगीता भिंगारदिवे.**

डॉ. मेघा पानसरे म्हणाल्या, "शासन व धर्मसत्ता एकत्र आल्यास महिलांसाठी धोका निर्माण होतो. राज्यघटनेतील धर्मनिरपेक्षता, सांस्कृतिक विविधता ही मूल्ये धोक्यात आली आहेत."

भारतीय महिला फेडरेशनच्या वसुधा कल्याणकर यांनी औरंगाबादेतील दंगलीतील कुटुंबीयांना मदत करण्याची गरज व्यक्त केली. रवि देसाई यांनी महिलांच्या आरोग्याबाबत दुर्लक्ष करून चालणार नाही. महिला धोरणात गांभीर्याने विचार झाला पाहिजे, असे सांगितले.

सर्वसमावेशक संस्थेच्या शैला यादव यांनी भटक्या विमुक्तांच्या विकासासाठी शासनाने पावले उचलावीत, असे आवाहन केले. रिटा माने यांनी भंगार गोळा करणाऱ्या महिलांच्या सर्व्हेकडे लक्ष वेधत त्यांच्या आरोग्याची काळजी घेण्याची गरज असल्याचे सांगितले. विद्रोही महिला मंचच्या संगीता भिंगारदिवे व शब्बीर कलेगार यांनी वंचित, उपेक्षित, अल्पसंख्याक महिलांचे प्रश्न सोडवण्याची मागणी केली.

ज्येष्ठ स्त्रीवादी कार्यकर्त्या मनीषा गुप्ते, मीना शेषू, अनुराधा भोसले, स्मिता पानसरे, शुभदा देशमुख, लता भिसे, सुमन पुजारी, विभूती पटेल उपस्थित होत्या. काजल जैन यांनी सूत्रसंचालन केले.

### अजूनही दुरावा

**आंतरजातीय विवाह केलेल्या आस्मा यांनी विवाह होऊन तीन वर्षे झाली आहेत. मात्र, कुटुंबीयांनी अजूनही आपला स्वीकार केलेला नाही, अशी खंत व्यक्त केली. त्यांना स्टेजवरच अश्रू अनावर झाले.**

### परिषदेतील मागण्या

- **महिला धोरणात स्वच्छतागृहाचा गांभीर्याने विचार**
- **औरंगाबाद दंगलीतील नुकसानग्रस्त महिलांना मदत**
- **दलितांना आरोग्यसेवेत भेदभाव करू नये**
- **ऑनर किलिंगविरोधी व आंतरजातीय विवाहाचा कायदा व्हावा**

लोकमत

## दैनंदिनी



- **परिषद** : श्रीमती शारदाबाई पवार अध्यासनतर्फे आयोजित महिला हक्क परिषदेचा समारोप. **स्थळ** : वि. स. खांडेकर भवन, शिवाजी विद्यापीठ. **वेळ** : दु. १२.०० वा.

लोकमत

# सिनेट हॉलचे नूतनीकरण



शिवाजी विद्यापीठातील ५० वर्षे पूर्ण केलेल्या राजर्षी शाहू सभागृहाचे (सिनेट हॉल) नूतनीकरण केले जात आहे. नव्या रुपात या सभागृहाला 'वाय-फाय' सुविधेची जोड मिळणार आहे. विद्यापीठाच्या वर्धापनदिनाचा कार्यक्रम उद्या, रविवारी या सभागृहात होणार आहे. त्यासाठी नूतनीकरणाचे काम लवकर पूर्ण करण्याची लगबग शुक्रवारी सुरु होती.

Kolhapur Main
Page No. 4 Nov 17, 2018
Powered by: erelego.com